गोदातीर दि 07/02/2023

# एक गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतुसांसह एका आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक



**नांदेड-** शहरातील तरोडा नाका भागात एक व्यक्ती संशयास्पद पद्धतीने फिरत होता. त्याची कसून चौकशी केली असता त्यांच्याकडे गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतूस आढळून आले. पोलिसांनी या प्रकरणात अटक केली आहे.

अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींची माहिती काढून त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला केल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने वेगवेगळी पथके तयार करुन शहरात अवैद्य अग्नीशस्त्र बाळगणारे आरोपीताविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत आदेश दिले होते.

पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना दि. ६ फेब्रुवारी रोजी नांदेड शहरातील तरोडा नाका, नांदेड येथे एक इसम स्वतःजवळ पिस्टल बाळगून असल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी स्थागुशाचे अधिकारी व अमंलदार याना तरोडा नाक्याकडे रवाना केले. स्थागुशाचे अधिकारी व अमंलदार यांनी तरोडा नाका नांदेड येथे जावून आरोपी शेख जुनेद शेख हबीब (वय २० वर्ष रा. जुम्मापेठ, ता. वसमत जि. हिंगोली) यास पकडून त्यांची झडती घेतली असता, त्याच्या कमरेला लावलेले एक गावठी बनावटीचे पिस्टल व दोन जिवंत काडतूस किंमती ४१ हजार २०० रुपयाचे मिळून आले. पिस्टल, काडतुसासह आरोपीला अटक करण्यात आली. आरोपीविरुध्द सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांनी फिर्याद दिली असून भाग्यनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या सुचनेनुसार सपोनि पांडुरंग माने, पोउपनि जसवंतसिंघ शाहु, पोना सजिंव जिंकलवाड, पोकॉ मोतीराम पवार, पोकॉ महेश बडगु, चा पो कॉ गंगाधर घुगे, चापोकॉ हेमंत बिचकेवार यांनी पार पाडली आहे.